सकाळ
सिंधुदुर्ग, बुधवार, ३० नोव्हेंबर २०२२



दोडामार्ग : येथे महात्मा फुले यांना स्मृतिदिनी अभिवादन करताना मान्यवर.

# महात्मा जोतिबा फुले यांना दोडामार्ग येथे अभिवादन

दोडामार्ग : येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात महात्मा जोतिबा फुले यांचा स्मृतीदिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या त्याग आणि कर्तृत्वामुळे देशातील तळागाळातील, गाव-खेड्यांतील मुली शिक्षणाच्या प्रवाहात येऊन गुणवत्ता सिद्ध करीत आहेत. याचे सर्व श्रेय महात्मा फुले यांचे आहे. घरचे प्रचंड श्रीमंत असलेल्या फुलेंनी आपली सर्व संपत्ती मुलींच्या शिक्षणासाठी खर्च केली. यातना सहन केल्या. त्यामुळे फुले दाम्पत्याचे देशावर मोठे उपकार आहेत. त्यांच्या ऋणात राहून समाजासाठी भरीव काम करण्याची गरज आहे, असे ते म्हणाले. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. डी. गाथाडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. दिलीप बर्वे यांनी आभार मानले.